# Shri Lemdeo Patil Mahavidyalay Mandhal, Dist Nagpur

## Department of Marathi

## मराठी विभाग

**बी. ए . भाग ३ (सहावे सत्र ) B.A.III Sem VI**

**घटक : मराठी गद्य/ प्रकरण : नववे**

**अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची वाटचाल**

**लेखक : नरेंद्र दाभोळकर**

---------------------------------------

डॉ. तीर्थराज कापगते

मराठी विभाग प्रमुख

# डॉ. नरेंद्र अच्युत दाभोळकर

## जन्म : सातारा येथे १९४५ मध्ये

## २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात गोळ्या घालून हत्या



१९८३ पासून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्य. त्यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना . साधना साप्ताहिकाचे संपादक.

# अंधश्रद्धा म्हणजे काय ?

आंधळेपणाने एखादी गोष्ट स्वीकारणे याला अंधश्रद्धा असे म्हणतात.उदा. काळी जादू , तंत्र-मंत्र, जादूटोणा , नरबळी, भूत प्रेत पिशाच्च यांच्यावर विश्वास , अथवा पसरवणे, त्यासंदर्भात कृती करणे.

अंधश्रद्धा या अज्ञानाचा, अगतिकतेचा भाग असतात, सृष्टीतील घडामोडींचे नियम ज्ञात झालेले नसतात ;

समाजव्यवस्था जन्मसिद्ध विषमतेवर आधारलेली असते आणि ही परिस्थिती दूर करण्यासाठी
विज्ञानाचा व अद्ययावत कालोचित मूल्यभावांचा आधार घेतला जात नाही, तेव्हा अंधश्रद्धा निर्माण
होतात आणि बळावतात. अंधश्रद्धा माणसाला दुबळा आणि अगतिक बनवतात. त्याची चिकित्सक बुद्धी आणि विवेकशक्ती नष्ट करतात. हळूहळू माणूस मानसिक गुलामगिरीत अडकत जातो. अन्य प्राण्यांपेक्षा माणूस शारीरिकदृष्ठ्या दुबळा आहे.
तरीही, अन्य प्राण्यांना न साधलेली भौतिक प्रगती त्याने साध्य केली आहे,
ती केवळ त्याच्या बुद्धीच्या आणि चिकित्सा वृत्तीच्या जोरावर.


समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विमहाराष्ट्राने २०१३ साली घातक वृत्तीकडून
होणारे थांबवण्यासाठी कठोर कायदा केला आहे. शोषण थांबविण्यासाठी महाराष्ट्राने २०१३ साली कठोर कायदा केला.. त्याचे संक्षिप्त नाव माहाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष , अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध कायदा २०२३ असे अआहे. डॉ. दाभोळकर आणि प्रा. श्याम मानव यांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी केलेल्या

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य म्हणजे कृतीशील प्रबोधन असून हे कार्य शास्त्रीय पद्धतीने व वैदन्यानिक दृष्टीकोनातून पुढे गेले पाहिजे अशी भूमिका घेत वीस वर्षांपूर्वीपासून या कार्याच्या वाटचालीचा मागोवा व उहापोह या प्रकरणात दाभोळकरांनी केला आहे

अंधश्रद्धा निर्मूलनाची काम सुरू झाले तेव्हा लोकांनी त्या चालावालीची उपेक्षा केली
काहींना ते चिल्लर जादूचे प्रयोग वाटले. काही लोकांना ते पुरोगामी कार्याला पूरक वाटले , पण दाभोळकर ही वाटचाल कोणत्या मार्गाने झाली याची शास्त्रशुद्ध चर्चा करतात.

# अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या वाटचालीचे मार्ग

- अंधश्रद्धा निर्मूलन
- शास्त्रीय विचारपद्धती
- वैज्ञानिक दृष्टिकोन
- धर्मचिकित्सा
- धर्मनिरपेक्षता
- विवेकवाद
- मानवतावाद



# अंधश्रद्धा निर्मूलन

एकाची श्रद्धा ही दुसऱ्यासाठी अंधश्रद्धा असली तरी जादूटोणा सदृश्य गोष्टी आणि अघोरी व अनिष्ट प्रथा या निश्चितच अंधश्रद्धा आहेत. ज्यामुळे शोषण होते. अशा अंधश्रद्धांच्या संदर्भात कायदा बनवून शासनाने त्यात सुमारे १२ बाबींचा समावेश केला. त्यांचे आचरण हा दंडनीय गुन्हा ठरवण्यात आला. हा कायदा निर्णयाच्या अवस्थेत आहे असे डॉ. दाभोळकर सांगतात पण त्यांच्या मृत्युनंतर हा कायादा मंजूर झाला. डॉ. दाभोळकर यांना  विश्वास वाटतो की भविष्यात एखादी बाब अंधश्रद्धा आहे की श्रद्धा हा वाद निकाली निघेल आणि या क्षेत्रात स्पष्टता येईल.

# शास्त्रीय विचारपद्धती

- या चळवळीच्या वाटचालीची पुढची पायरी म्हणजे शास्त्रीय विचारपद्धती  जनमानसात रुजवणे.
- शास्त्रीय विचारपद्धती म्हणजे एखाद्या घटनेबाबत निरीक्षण , तर्क , अनुमान ,प्रचीती ,प्रयोग या पद्धतीने निर्णय घेणे.
- मनोव्यापार निर्भय होणे , जीवनाकडे बघण्याचा सम्यक व विशाल दृष्टिकोन निर्माण होणे , स्वत:च्या आयुष्याची भावनिक , बौद्धिक प्रत वाढवणे हे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे मुख्य फायदे आहेत.

# वैज्ञानिक दृष्टिकोन

- वैज्ञानिक दृष्टिकोनात शोधकता असावी लागते त्याबरोबरच सम्यकता
  निर्भयता , कृतिशीलता , आणि नैतीकातादेखील असावी लागते.
- वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा माणूस एक सम्यक जीवनदृष्टी बाळगत असतो.हे विश्व स्वायत्तपणे अस्तित्वात आहे अशी त्याची ठाम भावना असते.
- वैज्ञानिक दृष्टिकोन माणसाला दैववाद, अगतिकता यापासून दूर नेतो.
- हा दृष्टिकोन म्हणजे सारासार विचाराचे दुसरे रूपच

# धर्मचिकित्सा

- धर्मातील कालबाह्य कालविसंगत हास्यास्पद रूढी ,परंपरा , कर्मकांडे यांच्यावर समाजसुधारकांनी प्रहार केले. ते कार्य समाजाला पुढे नेणारे मानले जाते.
- अंधश्रद्धा निर्मूलन समिती हेच कार्य पुढे चालवीत आहे.
- भारतीय घटनेतही नागरिकांच्या कर्तव्यात वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्यासोबतच सुधारणेचे तत्त्व अंगीकारणे असे कर्तव्य सांगितले ते तत्त्व म्हणजे कालसुसंगत धर्मचिकित्सा होय
- जसा एक श्रद्धा बाळगण्याचा अधिकार आहे तसाच

# धर्मनिरपेक्षता

- अंधश्रद्धा निर्मूलन , शास्त्रीय विचारपद्धती , वैज्ञानिक दृष्टिकोन , धर्मचिकित्सा  या मार्गाने होणारा प्रवास धर्मनिरपेक्षतेपर्यंत येतो.
- धर्मनिरपेक्षता हा भारतीय संविधानाचा ढाचा आहे. विज्ञानपूर्व काळातील सर्वधर्म  सारखेच अर्थहीन झाल, आहेत. तेव्हा सर्वच धर्मांना नकार द्यावा, अशी एक मांडणी आहे . दुसरी मांडणी अशी आहे की शासनाने धर्मनिरपेक्षता राबवावी. तिसरा मुद्दा आर्थिक शोषणाचा आहे.
- समाजसुधारकांनी समाजाविन्मुख धर्म समाज्संमुख केला , ईश्वरकेंद्री धर्म मानवकेंद्री केला.परालोकावाडी

# विवेकवाद

- विवेक म्हणजे विशिष्ट प्रसंगात योग्य काय आणि अयोग्य काय हे ठरवण्याची बुद्धी ही बुद्धी प्रत्येक माणसाजवळ असते.
- निर्मूलनाची चळवळ ही जरी अंधश्रद्धा निर्मूलनापासून सुरू झाली, तरी अंधश्रद्धा निर्मूलन ते शास्त्रीय विचारपद्धती, शास्त्रीय विचारपद्धती ते वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन ते धर्मचिकित्सा, धर्मचिकित्सा ते धर्मनिरपेक्षता आणि धर्मनिरपेक्षता ते विवेकवाद आणि मानवतावाद या मार्गाने ही चळवळ पुढे जाण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे स्वाभाविकपणेच 'विवेकवाद' हे मूल्य अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या व्यापक तत्त्वज्ञानाचा भाग आहे.
- शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांच्या विरोधात संघर्ष केला , त्यासाठीए लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न केला , त्यासाठी आवश्यक तेव्हाधी धर्मचिकित्सा केली , अशी धर्मचिकित्सा करताना धर्मनिरपेक्षतेची वेगळी मांडणी केली तर माणसाची विवेकबुद्धी अधिकाधिक मोकळी होत जाते असे डॉ. दाभोळकर म्हणतात.
- 'विवेकवाद' हे कशाचं तत्त्वज्ञान आहे? विवेकवाद हे सुखी जीवनाचं तत्त्वज्ञान आहे. मात्र एकाच वेळेला हे सुख भौतिक आहे, बौद्धिक

# मानवतावाद

- मानवतावाद म्हणजे माणूस म्हणून जगण्याची साधीसोपी पद्धत , ज्यात माणसामाणसांमध्ये कोणताही भेद नाही. संपूर्ण मानवजातीसाठी मानवतावाद हा एक धर्म आहे.
- स्वातंत्र्य , समाता , बंधुता आणि सामाजिक न्याय ही मानवतावादाची ध्येय.
- वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस मानवतावादी नसणे शक्य आहे ; पण प्रत्येक मानवतावादी माणसापाशी वैज्ञानिक दृष्टिकोन मात्र असलाच पाहिजे.

# समारोप

## खालील लेख अधिक अभ्यासासाठी ‘ विवेकवाद आणि धर्मचिकित्सा ‘

- https://mediawatch.info/%e0%a4%b5%e0%a4%bf%e0%a4%b5%e0%a5%87%e0%a4%95%e0%a4%b5%e0%a4%be%e0%a4%a6-%e0%a4%86%e0%a4%a3%e0%a4%bf-%e0%a4%a7%e0%a4%b0%e0%a5%8d%e0%a4%ae%e0%a4%9a%e0%a4%bf%e0%a4%95%e0%a4%bf%e0%a4%a4%e0%a5%8d%e0%a4%b8/
-